तिलकच्या प्रतिभेवर ठाम विश्वास!

गुजरातविरुद्धच्या शतकानंतर मुंबईचा कर्णधार हार्दिककडून कौतुक

वृत्तसंस्था, अहमदाबाद

तिलक वर्मामधील अलौकिक प्रतिभेवर आम्हाला नेहमीच विश्वास होता. मात्र, त्याने आपल्या क्षमतेप्रमाणे खेळ दाखवणे गरजेचे होते आणि तो त्यात यशस्वी ठरल्याचा आनंद असल्याचे वक्तव्य मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याने केले. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये सलग चार पराभवानंतर अखेर विजयाच्या मार्गावर परतलेल्या मुंबईसाठी तिलकने निर्णायक शतकी खेळी केली. त्याच्या खेळीच्या जोरावर मुंबईने गुजरात टायटन्सचा ९९ धावांनी पराभव करत आपली निव्वळ धावगतीही सुधारली.

मुंबईच्या संघाला अहमदाबाद येथे गुजरात टायटन्सकडून यापूर्वी सलग चार पराभव पत्करावे लागले होते. सोमवारी झालेल्या सामन्यातही मुंबईची सुरुवात अडखळती झाली होती. मात्र, अवघड खेळपट्टीवर तिलकने ४५ चेंडूंत नाबाद १०१ धावांची शानदार खेळी करत मुंबईला भक्कम धावसंख्या उभारून दिली. तिलकने सुरुवातीच्या २२ चेंडूंत अवघ्या १९ धावा केल्या होत्या. परंतु दुसऱ्या 'स्ट्रॅटेजिक टाइम-आऊट'मध्ये कर्णधार हार्दिकने त्याला अधिक मोकळेपणाने खेळण्याची सूचना केली. त्यानंतर त्याच्या फलंदाजीत आमूलाग्र बदल दिसला.

''तिलककडे असलेली गुणवत्ता पाहता त्याने कोणतीही चिंता करू नये, असे मी त्याला सांगितले. फक्त चेंडू बघ आणि फटका मार, एवढाच मी त्याला संदेश दिला. तिलकने आज जे केले ते, त्याच्यासाठी, संघासाठी आणि मुंबई इंडियन्स फ्रँचायझीसाठी महत्त्वाचे होते,'' असे हार्दिकने सांगितले.

अहमदाबादमध्ये गुजरात संघाविरुद्ध मुंबईचा हा पहिलाच विजय ठरला. ''प्रतिस्पर्ध्याच्या मैदानावर जिंकणे खूप कठीण असते. अहमदाबाद आमच्यासाठी नेहमीच अवघड ठिकाण राहिले आहे. मात्र, या सामन्यात आम्ही चांगला खेळ केला. हा विजय खूप खास आहे. तो अत्यंत आवश्यक होता,'' असे हार्दिकने नमूद केले.

यंदाच्या 'आयपीएल' हंगामातील पहिल्या पाच सामन्यांत जसप्रीत बुमराची बळींची पाटी कोरी होती. मात्र, गुजरातविरुद्ध त्याला पहिले षटक टाकण्याची संधी मिळाली आणि त्याने पहिल्याच चेंडूवर साई सुदर्शनला माघारी धाडले. यापूर्वी बुमराला सुरुवातीची षटके न देण्याच्या निर्णयावर टीका केली जात होती. त्याला हार्दिकने प्रत्युत्तर दिले. ''बुमराला सुरुवातीला षटक का देत नाहीस, असा प्रश्न लोक विचारत असतात. मात्र, त्याने १४० सामन्यांमध्ये फक्त ७-८ वेळाच पहिले षटक टाकले आहे. त्यामुळे ही केवळ हार्दिक पंड्या समस्या नाही. प्रत्येकच जण असा निर्णय घेताना दिसतो. बुमरा इतका खास आहे की अखेरच्या षटकांसाठी त्याला राखून ठेवावे असे प्रत्येकच कर्णधाराला वाटते,'' असेही हार्दिक म्हणाला.

गोलंदाजांच्या कामगिरीवर गिलची नाराजी

मुंबई इंडियन्सविरुद्धच्या मोठ्या पराभवानंतर गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल स्पष्टपणे निराश दिसला. "गोलंदाजीत मधल्या षटकांत आम्ही खूप धावा दिल्या. या खेळपट्टीवर १६०-१७० ही योग्य धावसंख्या ठरली असती," असे गिल म्हणाला. शेवटच्या तीन षटकांत (प्रसिध कृष्णाची दोन आणि अशोक शर्माचे एक षटक) एकूण ६७ धावा दिल्या गेल्याने गिल नाराज होता. "आम्ही योग्य टप्प्यावर चेंडू टाकू शकलो नाही. काही चेंडू चांगले होते, तर काही नव्हते. आमच्या कामगिरीत सातत्य नव्हते," असे त्याने नमूद केले.

राजस्थानची आज लखनऊशी गाठ

लखनऊ : सलग दोन पराभवांमुळे चिंतेत असलेल्या राजस्थान रॉयल्स संघाचे 'आयपीएल'मध्ये आज, बुधवारी होणाऱ्या लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात विजयी पुनरागमनाचे लक्ष्य असेल. राजस्थानचा कर्णधार रियान परागला अद्याप सूर गवसलेला नाही. त्यामुळे फलंदाज म्हणून वैयक्तिक कामगिरी सुधारण्याचे त्याच्यासमोर आव्हान असेल.

राजस्थानने यंदाच्या हंगामाची सुरुवात सलग चार विजयांसह केली होती. मात्र, त्यानंतर दोन सामन्यांत त्यांना हार पत्करावी लागली आहे. सनरायजर्स हैदराबादविरुद्ध राजस्थान संघ ५७ धावांनी पराभूत झाला. या लढतीत त्यांच्या आघाडीच्या फळीला योगदान देता आले नाही. मग गेल्या सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सविरुद्ध राजस्थान संघ चांगल्या स्थितीत होता. मात्र, अखेरच्या षटकांत गोलंदाजांच्या अपयशाचा राजस्थानला फटका बसला. तसेच राजस्थानला क्षेत्ररक्षणातही चांगली कामगिरी करता आलेली नाही. राजस्थानचा कर्णधार रियान परागने फलंदाजीत निराशाजनक कामगिरी केली आहे. त्याला सहापैकी तीन डावांत दुहेरी आकडाही गाठता आला नाही. त्याची हंगामातील सर्वोच्च धावसंख्या २० अशी आहे. त्यामुळे त्याने मोठी धावसंख्या करणे गरजेचे झाले आहे. लखनऊ संघही संघर्ष करताना दिसत आहे. प्रिन्स यादव वगळता कोणत्याही गोलंदाजाला प्रभाव पाडता आलेला नाही.

- **वेळ** : सायं. ७.३० वा.
- **थेट प्रक्षेपण** : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप

व्यापार तूट वाढण्यासह, गंभीर वित्तीय ताणही!

ऊर्जा धक्क्याबाबत 'मूडीज'चा अंदाज

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

ऊर्जा पुरवठ्यात दीर्घकाळ व्यत्ययातून भारताची व्यापार तूट वाढू शकते आणि जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थेच्या वित्तीय खात्यावरही गंभीर ताण येऊ शकतो. शस्त्रसंधी आणि शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न जरी झाला तरी पश्चिम आशियातील ऊर्जा उत्पादन प्रक्रिया व मालवाहतूक व्यवस्था पूर्ववत होण्यासाठी काही काळ लागणार असल्याने, प्रमुख वस्तूंच्या किमती काही काळासाठी उच्च पातळीवरच राहण्याची शक्यता आहे, असे 'मूडीज' या पतमापन संस्थेने सोमवारी प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात म्हटले आहे.

अमेरिका-इस्रायलने इराणविरुद्ध युद्ध छेडल्यापासून 'ब्रेंट क्रूड'च्या (खनिज तेलाच्या) किमती ३१ टक्क्यांनी वधारल्या आहेत. जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा तेलाचा आयातदार देश असलेल्या भारतात तेलाच्या वाढत्या किमतींमुळे आयात खर्चात लक्षणीय वाढ होईल. बरोबरीने महागाईत भर पडेल आणि कंपन्यांच्या नफ्याच्या प्रमाणावर याचा परिणाम संभवतो. हे नकारात्मक परिणाम पाहता, परदेशी गुंतवणूकदारांनी भारताच्या शेअर बाजारातून २०२६ च्या आतापर्यंतच्या चार महिन्यांत विक्रमी १,८६० कोटी डॉलर मूल्याची समभाग विक्री केली आहे. विशेषतः मार्च महिन्यात १,२७० कोटी डॉलरचा निव्वळ बहिर्प्रवाह यातून नोंदवला गेला, ज्याचा रुपयाच्या मूल्यावरही मोठा ताण दिसून आला.

'मूडीज रेटिंग्ज'ने सध्या भारताला 'बीएए३' असे मानांकन दिले असून, भारताच्या अर्थव्यवस्थेविषयी दृष्टिकोन 'स्थिर' असल्याचे नमूद केले आहे. इराण युद्धाच्या परिणामांचा विचार करून, या संस्थेने आर्थिक वर्ष २०२७ साठी भारताच्या वास्तविक सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा अंदाज पूर्वीच्या ६.८ टक्क्यांवरून कमी करून ६ टक्क्यांवर आणला आहे. ऊर्जा पुरवठ्यात दीर्घकाळ व्यत्यय राहिल्यास अधिक गंभीर आव्हाने निर्माण होऊ शकतात, अशी पुस्तीही तिने या अहवालातून जोडली आहे.

खनिज तेलाच्या वाढत्या किमतींचा कंपन्यांवर होणारा परिणाम एकसमान दिसणार नाही, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः तेल विपणन कंपन्यांना आणि सिमेंट व रसायने यांसारख्या इंधनावर अवलंबून असलेल्या क्षेत्रांना या किमतवाढीचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे.

सध्या तरी सरकारी मालकीच्या तेल विपणन कंपन्यांनी इंधनाच्या किरकोळ विक्री किमतीत वाढ केली नसल्याने, देशांतर्गत मालवाहतुकीशी संबंधित खर्च नियंत्रणात ठेवण्यात आला आहे. मात्र, खर्चाचा हा बोजा या तेल कंपन्यांच्या ताळेबंदावर हस्तांतरित झाला आहे, जो दीर्घकाळ सोसला जाईल, असे वाटत नाही, असे मूडीजने पुढे नमूद केले आहे.

विप्रोच्या 'बायबॅक' योजनेत प्रवर्तकांचाही सहभाग

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रमुख कंपनी विप्रोच्या सुमारे १५,००० कोटी रुपयांच्या समभाग पुनर्खरेदी (बायबॅक) योजनेत कंपनीचे प्रवर्तक देखील सहभागी होणार आहेत, अशी माहिती कंपनीच्या मुख्य वित्तीय अधिकारी अपर्णा अय्यर यांनी शुक्रवारी दिली.

कंपनीच्या संचालक मंडळाने 'निविदा पद्धती'द्वारे (टेंडर रूट) केल्या जाणाऱ्या कंपनीच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या समभाग पुनर्खरेदी प्रस्तावाला गुरूवारी मंजुरी दिली. ही प्रक्रिया आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. प्रति समभाग २५० रुपये दराने ६० कोटी समभाग विप्रोकडून खरेदी केले जाणार आहेत, ज्याचे एकूण मूल्य १५,००० कोटी रुपयांपर्यंत असेल. गुरुवारच्या सत्रातील शेअरच्या भावानुसार, कंपनीच्या भागधारकांना यातून त्यांच्याकडील समभागावर १९ टक्के लाभ मिळविता येणार आहे.

गेल्यावर्षी पार पडलेल्या इन्फोसिसच्या १८,००० कोटी रुपयांच्या पुनर्खरेदी योजनेत प्रवर्तक आणि प्रवर्तक गटाने सहभागी न होण्याचा निर्णय घेतला होता.

भागधारकांसाठी निराशाजनक निर्णय

समभाग पुनर्खरेदीमध्ये प्रवर्तकांनी सहभागी न होणे हे कंपनीच्या भविष्यातील वाढीवरील त्यांच्या विश्वासाची निदर्शक मानले जाते. त्या उलट समभाग पुनर्खरेदी प्रक्रियेत प्रवर्तकांच्या सहभागामुळे, किरकोळ गुंतवणूकदारांकडून खरीदल्या जाणाऱ्या समभागांचे प्रमाण राहण्याची शक्यता आहे, असे विश्लेषकांनी नमूद केले. म्हणजेच कंपनीकडून या माध्यमातून खरेदी केले जाणाऱ्या समभागांच्या स्वीकृतीचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आहे.

'सेन्सेक्स'ची ७५३ अंशांची कमाई

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: देशांतर्गत भांडवली बाजारात प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीने १ टक्क्यांहून अधिक उसळी घेत सलग तिसऱ्या सत्रात आशावाद कायम राखला आहे. खनिज तेलाच्या किमतीत झालेली घसरण आणि इराण व अमेरिका यांच्यातील चर्चेत प्रगती होण्याची आशा, यामुळे सेन्सेक्स ७५३ अंशांनी वधारला, तर निफ्टी २४,५५० पातळीच्या पुढे बंद झाला.

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध परिस्थिती निवळण्याच्या आशा ही गुंतवणूकदारांची जोखीम घेण्याची तयारी वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. खनिज तेलाच्या किमतींमध्ये आलेली नरमाई हे याला आणखी एक पूरक कारण ठरले. यामुळे भारतासारख्या तेलाच्या आयातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेसाठी महागाईबाबतच्या चिंता कमी होईल, तसेच विविध क्षेत्रांमधील कंपन्यांच्या नफ्याच्या संभाव्यतेबाबत स्पष्टता यातून वाढली आहे.

मंगळवारच्या सत्राअखेर सेन्सेक्स ७५३.०३ अंशांनी वधारून ७९,२७३.३३ या पातळीवर स्थिरावला. सत्रादरम्यान, सेन्सेक्सने ८४६.७८ अंशांनी उसळी घेत ७९,३६७.०८ या उच्चांकी पातळीला स्पर्श केला होता. दुसरीकडे निफ्टी २११.७५ अंशांनी वधारून २४,५७६.६० या पातळीवर बंद झाला.

इराण-अमेरिका शांतता चर्चेत प्रगतीच्या आशा आणि अनुकूल जागतिक संकेतांच्या पार्श्वभूमीवर, देशांतर्गत शेअर बाजारात जोरदार तेजी आली. कंपन्यांच्या चौथ्या तिमाहीत ठोस कमाईच्या जोरावर ग्राहकोपयोगी वस्तू (एफएमसीजी) आणि गृहनिर्माण क्षेत्रांनी या तेजीचे नेतृत्व केले, तर रिझर्व्ह बँकेने परकीय चलनाबाबत बँकांवरील निर्बंध शिथिल केल्यानंतर बँकिंग समभागांमध्ये वाढ झाली. नजीकच्या काळात, गुंतवणूकदार कंपन्यांच्या कमाईवर लक्ष केंद्रित करतील अशी अपेक्षा आहे. कंपन्यांची मिळकत कामगिरी आश्वासक राहण्याची आशा आहे.

जायबंदी आयुष म्हात्रे उर्वरित 'आयपीएल'मधून बाहेर

पीटीआय, नवी दिल्ली

चेन्नई सुपर किंग्जचा फलंदाज आयुष म्हात्रे पायाला झालेल्या दुखापतीमुळे 'आयपीएल'च्या सध्या सुरू असलेल्या हंगामातील उर्वरित सामन्यांना मुकणार आहे. आयुषला १८ एप्रिलला सनरायजर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात दुखापत झाली होती. आता त्याला १२ आठवडे 'पुनर्वसन कार्यक्रमात' सहभागी व्हावे लागेल, असे फ्रँचायझीकडून सांगण्यात आले.

''आयुषला हैदराबादविरुद्धच्या सामन्यादरम्यान फलंदाजी करताना पायाला दुखापत झाली होती. त्यामुळे तो सध्याच्या 'आयपीएल' हंगामाबाहेर गेला आहे,'' असे चेन्नई सुपर किंग्जने समाजमाध्यमांवरून जाहीर केले. हैदराबादविरुद्धच्या सामन्यात चेन्नईला १० धावांनी पराभव पत्करावा लागला होता. त्या सामन्यात आयुष प्रभावी खेळाडू (इम्पॅक्ट प्लेयर) म्हणून मैदानात उतरला होता. धाव घेताना आयुषच्या पायाला दुखापत झाली.

बँक ऑफ इंडिया

नातं बँकिंग पलिकडचं

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस महावीर उद्यान समोर,रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : ard.vidarbha@bankofindia.bank.in

वाहनांच्या ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 6(2) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत आणि हायपोथीकेशन कलम अंतर्गत स्थावर वाहनांच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषतः खालील कर्जदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा भौतिक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर वाहनांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित वाहन तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी प्रत्येक सुरक्षित वाहनासमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ 26-05-2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00

(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सादर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह)

वाहनाच्या तपासणीची तारीख आणि वेळ 30-04-2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00

संपर्क व्यक्ती : श्री शुभम मस्के मो.8237771144, श्री स्वप्नील अग्रवाल मो. 8888334383

अ. क्र.	शाखा	वाहनाचे कर्जदार/ जामीनदार/खरेदीदार/ भागीदार/गहाणदाराचे नांव	विक्री करावयाच्या वाहनांची माहिती	बँकाच्या देयकाची माहिती	ताबा प्रकार	किमान राखीव किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.
1	बाबुपेठ	श्री बिस्वजित अमुल्य देबनाथ (कर्जदार-हायपोथीकेटर)	Honda Amaze 1.2 MT S(O) I-VTEC (Petrol) BS4 Reg. No.- MH34BF3956 Chassis no.: MAKDF15PJHN203355 Engine No.: L12B35137745 Year of Manufacture: 09/2017	रु. 6,72,257.88 + एनपीए च्या तारखेपासून युसीआय + इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 1,88,000/-	रु. 18,800/-
2	रालेगांव	श्री हरीचंद्र बंडुजी पांढळ (कर्जदार-हायपोथीकेटर)	NIssan Datsun Go + T (Petrol) BS 4 Reg. No. - MH29BC2651 Chassis No.: MDHJBAADOJ1701208 Engine No.: HR12787226D Year of Manufacture: 01/2018	रु. 3,67,025.73 + एनपीए च्या तारखेपासून युसीआय + इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 1,05,000/-	रु. 10,500/-
3	अकोला	श्री नविन दौलत वाधवानी (कर्जदार-हायपोथीकेटर	Suzuki Access 125 disc BT Alloy Wheel Reg. No. – MH30BQ8354 Chassis No.: MB8DP12DHN8C61899 Engine No.: AF21715 Year of Manufacture: .03/2021	रु. 60,235.00 + एनपीए च्या तारखेपासून युसीआय + इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 45,000/-	रु. 4,500/-
4	भंगाराम तलोधी	श्री दिपक भाऊजी झाडे (कर्जदार-हायपोथीकेटर)	Mahindra and Mahindra Maximo Plus Reg. No.: MH34AV0542 Engine No.: HRF6F24352 Chassis No.: MA1FA2HRRF6F20344 Manufacture Year: 05/2015	रु. 1,68,845.71 + एनपीए च्या तारखेपासून युसीआय + इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 20,000/-	रु. 2,000/-
5	मानोरा	श्री कैलाश दुर्गेह पोंगांटी (कर्जदार-हायपोथीकेटर)	Tata Ace Goods Carrler Reg. No.: MH34BG2584 Engine no.: G600WIV-DS8B8809999 Chassis No.: MAT491014J6C06788 Manufacture Year: 03/2018	रु. 3,14,331.34 + एनपीए च्या तारखेपासून युसीआय + इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 18,500/-	रु. 1,850/-
6	व्हीएमव्ही रोड	श्री मनोज दिलीपराव बोचरे (कर्जदार-हायपोथीकेटर)	Tata Signa 4825 TK BS6 10 x 4 29 BOX Truck (Fully Bullt) Reg. No.: MH27BW9797 Chassis No.: MAT808015L1P09414 Engine No.: B67B6A250D02102M64131614 Date of Reg.: 16.02.2021 Manuf. Date: 12/2020	रु. 28,27,890.15 + एनपीए च्या तारखेपासून युसीआय + इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 28,50,000/-	रु. 2,85,000/-

ई-लिलवाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1) ई-लिलाव "जे आहे जेथे आहे, आणि " जे काही आहे ते आहे आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल.

2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करुन घेण्यासाठी कृपया **https://bankofindia.bank.in** ला भेट द्या.
a) ई-लिलाव सेवा पुरवठा दाराच्या वेबसाईटचा पत्ता : **https://baanknet.com/.** बोलीदार हे **https://baanknet.com/** येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
टप्पा - 1 : बोलीदारांची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईएफटी/हस्तांतरण ई-लिलाव पलॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकालः इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपुर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत.

3) वाहने "जशी आहे जिथे आहे", "जशी आहे जे आहे" आणि "जशी आहे परिस्थिती आहे" या तत्वावर विकली जातात आणि इच्छुक बोलीदारांनी बँकेच्या शुल्का व्यतिरिक्त कोणत्याही दाव्याबदद्ल, कोणत्याही प्राधिकरणाच्या वाहनांवरील शुल्काबाबत, प्रलंबित आरटीओ कर, विमा इत्यादीबाबत गोपनीय चौकशी करावी आणि त्यांची बोली सादर करण्यापुर्वी वाहनांचे मालकी हक्क, व्याप्ती गुणवत्ता आणि प्रमाण याबदद्ल स्वतःची खात्री करुन घ्यावी.
ऑनलाईन बोली सादर केल्यानंतर विक्रीसाठी ठेवलेल्या वाहनांबाबत, वाहनावरील शुल्क/भार किंवा इतर कोणत्याही बाबींबाबत कोणत्याही स्वरुपाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

4) बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी वाहनांच्या संदर्भात पाहणी करुन स्वतःची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन वाहनाची पाहणी करता येईल. वाहनांच्या पाहणीसाठी दिनांक : **30.04.2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात याव्यात.

6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.

7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल. जर राखीव किंमत रु.3,00,000/- पेक्षा जास्त आणि रु.3,00,000/- पेक्षा कमी असेल तर रु.रु.2,000/- (रु.दोन हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.

8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परतावा करण्यात येईल.

9) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) ठेवीवर किंवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून ताबडतोब त्याच दिवशी किंवा काही कारणासाठी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याचा भरणा करावा लागेल. खरेदी किंमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यास अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदाराने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास स्वतंत्र आहे.

10) वेबसाईटवरील लिलावामध्ये सहभाग आणि बोली लावणे हे असे मानले जाईल की बोली लावणा-याने लिलावाशी संबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.

11) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्कची अडचण/वीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. असे प्रसंग होऊ नयेत यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी तांत्रिकदृष्टया सक्षम असावे आणि योग्य असा पॉवर बॅकअप त्यांच्याकडे असावा.

12) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पुढे ढकलणे/ रदद् करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतेही वाहन मागे घेणे याचा संपूर्ण अधिकार सुरक्षित कर्जदार/प्राधिकृत अधिकारी कडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित वाहनांचा तपशील सुरक्षित कर्जदार/ प्राधिकृत अधिका-यांच्या माहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी याला सुरक्षित कर्जदार/ प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.

13) खरेदीदाराला वाहनाशी सबंधित स्टॅम्प डयुटी, विक्री प्रमाणपत्रासह शुल्क, नोंदणी शुल्क सरकारला देय असलेले सर्व वैधानिक देयके, कर आणि दर आणि जावक विद्यमान आणि भविष्यातील दोन्हा खर्च सहन करावे लागतील. विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदारांच्या/अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.

14) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस अॅन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि हायपोथीकेशन कायदा अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम/शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांना संपर्क साधून प्राप्त करता येईल.

15) एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रदद् केली जाणार नाही. वापरकर्त्याच्या नोंदणीकृत आयडीवरुन केलेल्या सर्व बिड त्याने/तिनेच केल्या आहेत असे मानले जाईल.

16) ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार,जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.

कर्जदार/जामिनदारांना विक्री सुचना

ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल 2002, च्या नियम 8(2)अंतर्गत कर्जदार आणि जामिनदारांना (एल/आर.एस.) यांना वैधानिक विक्री सुचना म्हणून देखील मानली जाईल

माननीय महोदय/महोदया,

निम्न स्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार त्यांना ही विक्रीची सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बँकेद्वारे देण्यात आलेल्या कर्जाच्या संदर्भात थकीत देणी आणि व्याजासह मासिक दंड, शुल्क आणि भार वगैरे यांचा भरणा करण्यास असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुमच्यावर उपरोक्त नमूद रकमेचा भरणा 60 दिवसांमध्ये करण्यासाठी कलम 13(2) (अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही 60 दिवसांच्या मुदतीनंतरही रकमेचा भरणा करु शकला नाहीत म्हणून प्राधिकृत अधिका-यांना कलम 13(4) (च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन त्यांनी उपरोक्त परिशिष्ट मध्ये देण्यात आलेल्या सुरक्षित वाहनाचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा आणि जर असे न झाल्यास वाहनाची विक्री करण्यात येईल आणि जर काही शिल्लक असल्यास तुमच्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, मागणी सूचना, ताबा घेणे, वाहनांचे मुल्यांकन आणि विक्री यासाठी झालेला सर्व खर्च प्राधिकृत अधिका-याकडून कळवण्यात येईल आणि प्रथम तो वजा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उर्वरित योग्य भाग उपरोक्त नमूद तुमच्या लागू असणा-या देण्यांसाठी वापरण्यात येईल. अटी आणि शर्ती यावर आधारित असलेल्या लिलावामध्ये तुम्ही आवश्यक त्या बयाणा ईएमडी रकमेचा भरणा करुन सहभागी होऊ शकता.

ठिकाण : वर्धा
दिनांक : 22.04.2026

(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राहय मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६.
लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92. © दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.